Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 21/10/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटल्या, आतल्या वाटल्या... आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष



## प्रसिद्ध गायक, संगीतकार राम फाटक

रामचंद्र कृष्णाजी फाटक ऊर्फ राम फाटक हे मराठी गायक, संगीतकार होते. त्यांचा जन्म २१ ऑक्टोबर १९१७ रोजी झाला. रामभाऊंचे क्रमिक विद्याशिक्षण चालू असतानाच त्यांनी पुण्यात राहून ग्वाल्हेर गायकीचे धडे घेतले. बालगंधर्वांनी नाटक कंपनीत येण्याचे निमंत्रण देऊनही शिक्षणाच्या कारणासाठी त्यांनी नकार दिला. १९४५ मध्ये एचएमव्हीने त्यांची पहिली ध्वनिमुद्रिका प्रकाशित केली आणि रामभाऊंना आपले सुखनिधान सापडले.

शिक्षणाने एम.ए., बी.टी. असलेल्या राम फाटकांनी काही वर्षे शिक्षकी पेशा पत्करला. पुढे इ.स. १९५६ पासून पुढील १० वर्षे नागपूर आकाशवाणी केंद्रावर तर त्यापुढील १० वर्षे पुणे आकाशवाणीवर त्यांनी नोकरी केली. इथेच भास्करराव गोडबोले आणि जे.एल. रानडे यांच्यासारख्यांचे मार्गदर्शक त्यांना मिळाले. पुणे आकाशवाणी केंद्रावर असतानाच ज्येष्ठ गायक आणि संगीतकार सुधीर फडके यांच्याशी त्यांचा स्नेह जुळला. सुधीर फडक्यांच्या गीतरामायणामधील काही गाणी ते गायले. आकाशवाणीच्या पुणे केंद्रासाठी त्यांनी शास्त्रीय संगीत गायिका बेगम परवीन सुलताना यांच्याकडून काही मराठी भावगीते गाऊन घेतली.

रामभाऊंनी 'संतवाणी' मधील 'तीर्थ विठ्ठल', 'माझे माहेर पंढरी', 'पंढरी निवासा', 'अणुरेणीया थोकडा' हे पंडित भीमसेन जोशींकडून गाऊन घेतलेले अभंग खूपच लोकप्रिय झाले. याबरोबरच 'दिसलीस तू', 'डाव मांडून मांडून मोडू नको' आणि 'सखी, मंद झाल्या तारका' ही सुधीर फडक्यांनी गायलेली भावगीते प्रचंड गाजली. अनुष्टुभचा पु. शि. रेगे काव्य पुरस्कार, काव्यशिल्पचा बालकवी निसर्ग काव्य पुस्तक पुरस्कार, सावानाचा कवी गोविंद व छंदोमयी काव्य पुरस्कार, पद्मगंधा प्रकाशनाचा पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना मिळाले होते. राम फाटक यांचे २६ सप्टेंबर २००२ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Oct 21, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * CENTRAL LIBRARY * YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401